# आनंदमग्न व्हा, सद्‌गुणांची खाण बना

१ जून, २०१९

आत्मीय वाचकांनो,

आगमन झाले आहे आशीर्वादांनी परिपूर्ण अशा ‘आनंदमय जन्मदिवसाच्या’ महिन्याचे. या महिन्यादरम्यान, सिद्धयोग मार्गावर आपण एका अलौकिक पर्वाचा म्हणजेच आपल्या परमप्रिय श्रीगुरू, गुरुमाईंच्या जन्माचा आनंदोत्सव साजरा करतो. आपल्या दिव्य उपस्थितीने गुरुमाई अनेकांची हृदये त्यांच्या स्वतःच्या खऱ्या स्वरूपाप्रति जागृत करतात. ‘आनंदमय जन्मदिवसाच्या’ महिन्याचा जयजयकार असो!

श्रीगुरुमाईंची कृपा प्राप्त असण्याचे स्वर्णिम भाग्य लाभल्यामुळे विस्मित होऊन, माझे हृदय एक गीत गुणगुणू लागले आहे, जे मी तुम्हाला सांगू इच्छिते.

*मंगल ऋतु है छाई देखो, पावन बेला आई द्वार,*
*थिरक रही है यह धरती पाकर शुभ चरणों की ताल,*
*धन्य हुए हैं पवन-गगन सब, धन्य हुई प्रकृति की चाल।*
*इहलोक में आए हो तुम कराने नौका सबकी पार,*
*हाथों में दी डोर सत्य की, खोल दिए हिय के द्वार,*
*गाएँ किस विध स्तुति? तुम्हारी करुणा अपरम्पार,*
*पाकर प्रिय कृपा अहेतुक, धन्य हुए हमारे भाग।*

पाहा! मंगल ऋतूचे आगमन झाले आहे,
पावन घटिका आपल्या दारी आली आहे!
पृथ्वी शुभ चरणांच्या तालावर नृत्य करते आहे,
पवन-गगन तसेच प्रकृतीची हालचालही धन्य झाली आहे!
आम्हा सर्वांची नौका पार करविण्यासाठी तुम्ही इहलोकात आल्या आहात.
तुम्ही सत्याचा दोर आमच्या हाती दिला आहे, तुम्ही आमच्या हृदयाची कवाडे
खुली केली आहेत.

> आम्ही तुमचे स्तुतिगान कशा प्रकारे करावे? तुमची करुणा अपरंपार आहे,
> हे माझ्या जिवलगा! तुमची अहेतुक कृपा प्राप्त झाल्यापासून आमचे भाग्य धन्य झाले आहे.

साधकांच्या जीवनात या समयी या महिन्याला असलेले महत्त्व खरोखरच अतुलनीय आहे. एखाद्या प्रकाशस्तंभाप्रमाणे असलेल्या त्यांच्या शिकवणींसह, गुरुमाई या मार्गावरील आपल्या यात्रेस मार्गदर्शित करतात.

'मधुर सरप्राइझ्‌, २०१९' च्या त्यांच्या संदेश प्रवचनात गुरुमाई आपल्याला आपल्या साधनेत सद्‌गुण लागू कसे करावेत हे शिकवतात, जेणेकरून आपल्या अभ्यासांच्या पुनरावृत्तीला ते सदैव प्रफुल्लित, नित्यनूतन ठेवतील. हे स्वर्णिम साधन त्यांनी आपल्याला आपली साधना जिवंत ठेवण्यासाठी प्रदान केले आहे, एक अत्यंत प्रभावशाली आणि शक्तिशाली असा मार्ग प्रदान केला आहे. अगदी असेच करण्याची एक दुर्मीळ संधी आपल्याला या महिन्यात प्राप्त झाली आहे.

'आनंदमय जन्मदिवसाचा' प्रत्येक दिवस 'रत्नासमान' सद्‌गुणाने अलंकृत आहे, जसे गुरुमाईंनी आपल्या संदेश प्रवचनात सद्‌गुणांना संबोधित केले आहे. गुरुमाईंनी निवडलेल्या सद्‌गुणाच्या तेजाने प्रत्येक दिवस तळपत असतो. एखाद्या पाचूच्या पृष्ठीय रेषांवर प्रकाशाची किरणे पडल्यावर तो जसा चमकू लागतो, अगदी तसेच जेव्हा सद्‌गुण आपल्या कर्मांना स्पर्श करतात, तेव्हा आपली कर्मे त्यांच्या कांतीने झळाळू लागतात.

मी तुम्हाला आमंत्रित करते की, तुम्ही या महिन्यात वैभवशाली सद्‌गुणांच्या शृंखलेला आत्मसात करावे आणि त्यांना तुमच्या कृतींमधून प्रतिबिंबित होऊ द्यावे. गुरुमाईंच्या संदेशाचे अध्ययन करत असताना तुम्ही याला तुमचा दैनिक अभ्यास बनवा; हा अभ्यास तुमच्या मनाला त्याच्या स्वतःच्या तेजाशी जोडले जाण्यासाठी साहाय्य करेल. तुमच्यापैकी काहीजणांनी कदाचित यापूर्वीच प्रत्येक सद्‌गुणाशी संलग्न होण्याची स्वतःची, विशिष्ट अशी पद्धत अंमलात आणलेली असेल. हे अतिशय अद्‌भुत आहे! आणि तसे केले नसेल तरीदेखील, पुढे जा आणि अशी योजना तयार करा, जी तुमच्यासाठी परिणामकारक असेल.

* * *

या महिन्यात तुम्ही सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटला जेव्हा भेट द्याल, तेव्हा गुरुमाईंच्या नववर्ष संदेशाच्या तुमच्या अभ्यासाला वृद्धिंगत करणाऱ्या अनेक प्रकाशनांबरोबरच, हा अतिविशेष महिना

साजरा करण्यासाठी असणारी आणखी काही आनंददायी आणि प्रेरणादायी प्रकाशने तुम्हाला वेबसाइटवर आढळून येतील.

- सद्‌गुण वैभव — हा दिव्य सद्‌गुणांचा खजिना आहे, महिन्यातील प्रत्येक दिवसासाठी प्रत्येकी एक.
- मधुर प्रकाश, मधुर आनंद — हृदयस्पर्शी प्रतिमांची दिमाखदार मांडणी जी आपल्या हृदयाला मोहून टाकेल.
- Pick A Birthday Bliss Mango [पिक् अ बर्थ्‌डे ब्लिस् मँगो] — प्रत्येक लिंकवर क्लिक केल्यासरशी एक लज्जतदार मेजवानी तुमची वाट पाहते आहे. वर्ष २०१२ पासून प्रकाशित होणारी ही इंटरॲक्टिव्ह पोस्ट लोकप्रियतेमुळे खास आपल्या आग्रहास्तव पुनःप्रकाशित होते आहे. ☺ तेव्हा, तरुण असा किंवा वृद्ध, याचा आनंद लुटा!
- श्रीगुरुमाई के साथ संकीर्तन — गुरुमाईंच्या विविध नामसंकीर्तनांचे संकलन असलेली व्हीडिओ क्लिप, जिची आपण सर्वजण या ‘आनंदमय जन्मदिवसाच्या’ महिन्यात अतिशय आतुरतेने वाट पाहतो.
- Reflections on Gurumayi [रिफ्लेक्श्‌न्स् ऑन गुरुमाई] — वर्ष २०१४ पासून चालत आलेल्या एका सुंदर परंपरेअंतर्गत, सिद्धयोगी ‘आनंदमय जन्मदिवसाचा’ उत्सव साजरा करण्यासाठी गुरुमाईंच्या शिकवणींवर व त्यांच्यासोबत घडलेल्या प्रसंगांवर त्यांचे चिंतन-मनन लिहितात. तुमच्या स्वतःच्या चिंतन-मननाला प्रेरित करण्यासाठी वर्ष २०१९मधील काही नवीन प्रसंग तसेच मागील काही वर्षांमध्ये प्रकाशित झालेले प्रसंगदेखील वाचा.
- ध्यान-सत्र ६ : *Enrich the Worth of the Sadguna in Your Life.*
- ‘मधुर सरप्राइझ्, २०१९’, आता प्रथमच इटालियन, पोर्तुगिज आणि जपानी भाषेमध्येही उपलब्ध!

* * *

हा वैभवशाली महिना, आपण वर्ष २०१९च्या मध्यावर पोहोचलो आहोत याचीही एक खूण आहे. ही किती उचित वेळ आहे त्या संकल्पाचे पुनःपरीक्षण करण्याची, जो तुम्ही या वर्षाच्या सुरुवातीला तयार

केला होता आणि हे पाहण्याचीदेखील की, गुरूमाईंच्या संदेशाच्या तुम्ही केलेल्या अभ्यासाने व अध्ययनाने त्या संकल्पाच्या परिपूर्तीसाठी तुम्हाला कशा तऱ्हेने मदत केली आहे. सद्‌गुणांनी भारलेले व नवीनतम जोशाने पुरित असे तुमचे प्रयत्न, तुमच्या साधनेला पुन्हा ताजेतवाने करतील.

माझी मनोकामना अशी आहे की, प्रत्येक सद्‌गुणाने त्याच्या संपूर्ण वैभवासह स्वतःला तुमच्या समक्ष प्रकट करावे आणि तुमच्या कृतींमध्ये व तुमच्या विचारांमध्ये त्यांनी सामावून जावे. सद्‌गुण वैभव!

मला संतकवी कबीर यांच्या एका सुंदर दोह्याची आठवण होते आहे, जो मी श्रीगुरुमाईंकडून ऐकला होता. हा दोहा मला ‘रत्नासमान सद्‌गुणांची’ जोपासना करण्याच्या प्रेरणेने आणि दृढ संकल्पाने भरून टाकतो.

*शीलवन्त सबसे बड़ा, सब रतनन की खान।*
*तीन लोक की सम्पदा, रही शील में आन॥*

शीलवंत [सद्‌गुणसंपन्न] मनुष्य सर्वश्रेष्ठ असतो, तो समस्त अमुल्य रत्नांची खाण असतो.
तिन्ही लोकीची संपदा ही शीलामध्ये [सद्‌गुणांमध्ये] वसलेली असते.

आदरपूर्वक,

गरिमा बोरवणकर

© २०१९ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.